जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८२१ दिनांक - २१/११/२०२३**

युनिट-०१,गुन्हे शाखा,पुणे शहर

**खुना सारख्या गंभीर गुन्हयातील आरोपीस केले १२ तासात जेरबंद**

दिनांक २०/११/२०२३ रोजी स.नं.४८,काझी बिल्डिंग शिवरामदादा तालीम गल्ली,गणेश पेठ,पुणे याठिकाणी यातील फिर्यादी हे सिद्धार्थ हादगे व सुमित चव्हाण यांचेसह गप्पा मारत बसले असताना,तुषार कुंदुर,अशिष कुंदुर,हर्षल पवार व इतर ५ ते ६ जणांनी सदर ठिकाणी मोटार सायकलवर येवुन आपसात संगनमत करुन,सिद्धार्थ हादगे याचेशी जुन्या झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन,सिद्धार्थ याचे डोक्यात, मानेवर,गालावर व हातावर धारधार शस्त्राने वार करुन त्यास जीवे ठार मारले.फिर्यादी हे त्यास पाहण्यासाठी गेले असता,सदर इसमांनी त्यांचे डोक्यात वार करुन,त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून **फरासखाना पो.स्टे.गुरनं.२३३/२०२३,भादवि कलम ३०२, ३०७,१४३,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५),महा.पो.ॲक्ट ३७(१)(३)१३५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयातील इसमांना तात्काळ ताब्यात घेणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी मार्गदर्शनपर सुचना देवून,युनिट-०१ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करुन,शोध घेणे कामी रवाना केले होते.त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,शब्बीर सय्यद,युनिट-०१,गुन्हे शाखा यांचेसह युनिट कडील अधिकारी व अंमलदार हे शोध घेत असताना,पोलीस अंमलदार,अजय थोरात व अनिकेत बाबर यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी प्राप्त झाली की,शिवरामदादा तालीम मंडळाचे जवळ,गणेश पेठ,पुणे येथे सिद्धार्थ हादगे याचा खुन झाला होता.सदरचा खुन हा तुषार कुंदुर याने त्याचे साथीदारासह केला असुन,तुषार कुंदुर व त्याचा साथीदार आशुतोष वर्तले हे पौड फाटा,कोथरुड येथे थांबले असुन,ते कोठेतरी बाहेर निघुन जाण्याच्या तयारीत आहे.

प्राप्त बातमीचे अनुशंगाने वरिष्ठांना कळवुन स्वतः व स्टाफ यांचेसह सदर ठिकाणी तात्काळ जावुन बातमीदाराने दिलेल्या बातमी ठिकाणी जावुन पाहणी केली असता,पौड फाटा पुलाचे खाली,कोथरुड,पुणे येथे दोन इसम गडबडीत असल्याचे कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसले.त्यांचे हालचालीबाबत संशय आल्याने,त्यांचे जवळ जावुन,त्यांना ताब्यात घेवुन,त्यांचे नाव व पत्ता विचारता,त्यांनी आपले नावे **१)तुषार राजु कुंदुर,वय २१ वर्षे,रा.मेनकर वाडा,७६२ गणेश पेठ,पुणे २)आशुतोष संतोष वर्तले,वय २० वर्षे,रा.२६ नंबर शाळे जवळ,बुरुड आळी,७६७,गणेश पेठ,पुणे** असे असल्याचे सांगितले.त्यांना सोबतचे स्टाफचे मदतीने युनिट-१,गुन्हे शाखा कार्यालयामध्ये घेवुन येवुन,त्यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता, ताब्यातील तुषार कुंदुर याने सांगितले की,माझी सन २०२१ मध्ये सिध्दार्थ नंदकुमार हादगे याचेशी भांडणे झाली होती.त्यावेळी सिध्दार्थ हादगे याने माझ्यावर व माझा भाऊ आशिष कुंदुर यांचेवर वार केले होते. त्याबाबत खडक पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे.त्यानंतर देखिल सिध्दार्थ हादगे हा मला तसेच माझ्या भावाला शिवीगाळ करणे आमच्या वस्तीत येवुन दहशत करणे असे करुन वारंवार त्रास देत होता.

दिनांक २४/१०/२०२३ रोजी एल.टी.जी मंडळा मध्ये कोजागिरी पोर्णिमेचा कार्यक्रम होता.त्यावेळी सदर कार्यक्रमासाठी त्याचा फ्लेक्स लावलेला होता.त्यावेळी सिध्दार्थ हादगे याने सदर ठिकाणी येवुन दंगा करुन कार्यक्रमाचा फ्लेक्स फाडल्या मुळे माझी व सिद्धार्थ हादगे याची भांडणे झाली होती.

तसेच दिनांक १९/११/२०२३ रोजी माझा मित्र हर्षल पवार हा शेर-ए-पंजाब बार येथुन जात असताना त्यास सिध्दार्थ हादगे व त्याच्या सोबतचा अक्षय अमराळे यांनी आवाज देवुन,हर्षल यास थांबवुन सिध्दार्थ व अक्षय यांनी त्यास मारहाण करुन शिवीगाळ केली होती.तेथुन हर्षल पवार त्यांच्या तावडीतुन सुटुन माझ्या घरी येवुन,मला खुप मारहाण केली आहे अशी हकीकत सांगितली.त्यावेळी हर्षल पवार,आशितोष वर्तले, प्रथमेश कांबळे,प्रतिक करपेकर,समर्थ वर्देकर व माझा भाऊ आशिष कुंदुर असे सर्वजण महाराणा प्रताप शाळा नं.२६ व शिवरामदादा तालीम समोरील इमारती मध्ये जावुन,त्यास हत्याराने वार करुन व आशुतोष याने आणलेल्या दगडाने ठेचुन ठार मारले असे सांगितले.

एकंदरीत केलेल्या तपासावरुन वर नमुद दोन्ही आरोपींनी त्यांचे इत्तर साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिल्याने व त्यांचा संदर्भीय गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता फरासखाना पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.अमोल झेंडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शना खाली युनिट-१ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक,शब्बीर सय्यद,सहा.पोलीस निरीक्षक,आशिष कवठेकर,पोलीस उप-निरीक्षक,रमेश तापकीर,पोलीस अंमलदार,अजय थोरात,अनिकेत बाबर,महेश बामगुडे,निलेश साबळे,दत्ता सोनवणे यांनी केली आहे.